# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः29.05.2025** **वारःशुक्रवार**

---

1. कृषी क्षेत्राचा विकास हे विकसित भारताच्या उभारणीतील महत्त्वाचं पाऊल ठरेल, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. केंद्रीय कृषीमंत्र्यांच्या हस्ते देशव्यापी कृषी संकल्प अभियानाचा आरंभ
3. पंतप्रधान आज उत्तरप्रदेश, बिहारमध्ये 70 हजार कोटी रुपयांच्या विकासकामांचा प्रारंभ करणार
4. आशियाई ॲथलेटिक्स स्पर्धेत भारताच्या अविनाश साबळेला सुवर्ण पदक आणि
5. आयपीएल क्रिकेट स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बेंगलुरु संघाचा अंतिम फेरीत प्रवेश

**<u>पंतप्रधान</u>**

देशाच्या कृषी क्षेत्राचा विकास हे विकसित भारताच्या उभारणीतील एक महत्त्वाचं पाऊल ठरेल असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. देशव्यापी विकसित कृषी संकल्प अभियानाचा प्रारंभ काल ओडिशामध्ये केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्या हस्ते झाला. त्या निमित्तानं पंतप्रधानांनी समाजमाध्यमावर व्हिडिओ संदेश प्रसारित केला. शेतकऱ्यांच्या उत्पादनांना योग्य भाव मिळावा; कृषी अर्थव्यवस्था मजबूत व्हावी यासाठी केंद्र सरकार अनेक उपाययोजना करत आहे असं पंतप्रधान म्हणाले.

**<u>कृषि संकल्प अभियान</u>**

विकसित कृषी संकल्प अभियानांतर्गत देशातल्या 700 जिल्ह्यांमध्ये दोन हजारांहून अधिक कृषी शास्त्रज्ञ शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. देशातील कृषी क्षेत्रासाठी हा ऐतिहासिक दिवस असल्याचं केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी काल विकसित कृषी संकल्प अभियानाचा प्रारंभ करताना ओडिशामध्ये पुरी जिल्ह्यातल्या साक्षी गोपलन इथं बोलताना सांगितलं. कृषी उत्पादन वाढवण्यासाठी केंद्रीय कृषी मंत्रालय, राज्यांचे विभाग आणि कृषी विद्यापीठं एकत्रित काम करतील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**<u>पंतप्रधान-बिहार</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज बिहार आणि उत्तर प्रदेश या दोन राज्यांमध्ये 69 हजार चारशे कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या अनेकविध विकासकामांचा प्रारंभ करणार आहेत. बिहारच्या रोहतास जिल्ह्यातील विक्रमगंज इथं आज सकाळी ते 48 हजार 520 कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचं उद्घाटन, पायाभरणी आणि लोकार्पण करण्यात येईल. पंतप्रधान या दौऱ्यात ऊर्जा, रस्ते आणि रेल्वे मार्गांशी संबंधित विविध प्रकल्पांचंही उद्घाटन आणि पायाभरणी

करणार आहेत. त्यानंतर दुपारी ते उत्तरप्रदेशात कानपूर नगर इथं जवळपास 20 हजार 900 कोटी रुपयांच्या प्रकल्पाचं अनावरण करतील.

**राजनाथ AMCA**

पाचव्या पिढीतील प्रगत मध्यम लढाऊ विमान अर्थात AMCA या मालिकेतील विमानांचे उत्पादन सुरू करण्यापूर्वी  या स्टेल्थ फायटर जेटचे पाच नमुने विकसित करण्याचा भारताचा विचार सुरू असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काल सांगितलं. नवी दिल्ली इथं भारतीय उद्योग महासंघ अर्थात CII च्या व्यवसाय शिखर परिषदेत ते बोलत होते. मेक-इन-इंडिया हा आपल्या राष्ट्रीय सुरक्षेचा एक आवश्यक घटक असून ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारतानं दहशतवादाविरुद्ध केलेल्या प्रभावी कारवाईत त्यानं महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचं राजनाथ सिंह यावेळी बोलताना म्हणाले. AMCAच्या मॉडेलच्या निर्मितीच्या निमित्तानं, खाजगी क्षेत्राला पहिल्यांदाच सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांबरोबर मोठ्या संरक्षण प्रकल्पात सहभागी होण्याची संधी मिळणार असल्याचं संरक्षण मंत्र्यांनी अधोरेखित केलं. संरक्षण मंत्रालयानं हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड ला खाजगी क्षेत्रांच्या भागीदारीत स्टील्थ फायटर जेटची रचना आणि उत्पादन करण्यासाठी वापरासाठीचं मॉडेल तयार करण्यास मंजुरी दिली आहे.

**सीडीएस-सिंगापूर**

सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान आजपासून तीन दिवस सिंगापूरच्या दौऱ्यावर आहेत. इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्ट्रॅटेजिक स्टडीजच्या वतीनं आयोजित केल्या जाणाऱ्या 22व्या शांग्रीला संवाद या वार्षिक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी ते या सिंगापूरला भेट देत आहेत. त्यांच्या या भेटीत जनरल चौहान ऑस्ट्रेलिया, युरोपियन युनियन, प्रान्स, जर्मनी, इंडोनेशिया, जपान, नेदरलँड्स अशा विविध देशांच्या संरक्षण दल प्रमुखांशी द्विपक्षीय चर्चा  करतील. तसंच भविष्यातील युद्धं आणि युद्धतंत्र या विषयावर ते या क्षेत्रातील जाणकार, थिंक टँक्स आणि संशोधकांना संबोधित करणार आहेत.

**जयशंकर**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील संबंध विविध क्षेत्रात विस्तारत असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. न्यूझीलंडचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्री विन्स्टन पीटर्स यांच्याशी काल नवी दिल्लीत झालेल्या चर्चेनंतर जयशंकर यांनी हे विधान केलं. न्यूझीलंडचे पंतप्रधान क्रिस्तोफर लक्सन यांनी नुकतीच भारताला भेट दिली, त्यामध्ये उभय देशांमध्ये मुक्त व्यापार करारासंबंधीच्या वाटाघाटींना सुरुवात झाली तसंच विविध करार करण्यात आले, त्यामुळं त्यांची ही भेट यशस्वी ठरली होती असंही जयशंकर यांनी स्पष्ट केलं. या भेटीत दोन्ही देशांनी ठरविलेल्या उद्दीष्टं पूर्ण करण्याला सध्या प्राधान्य असल्याचंही त्यांनी पुढे सांगितलं.

**अमित शहा-काश्मीर**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली काल रात्री जम्मूमध्ये झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत जम्मू आणि काश्मीरमधील सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. येत्या 3 जुलैपासून सुरू होत असलेल्या वार्षिक अमरनाथ यात्रेच्या सुरक्षा आणि इतर व्यवस्थेचाही शाह यांनी या बैठकीत आढावा घेतला. या यात्रेसाठी करण्यात आलेल्या सुरक्षा उपाययोजनांबद्दल त्यांना माहिती देण्यात आली. शाह यांचं दोन दिवसांच्या काश्मीर दौऱ्यासाठी काल

जम्मूमध्ये आगमन झालं. ते आज पूंछला भेट देणार असून तिथं पाकिस्तानच्या गोळीबारामुळे प्रभावित झालेल्या लोकांची ते भेट घेणार आहेत.

**ट्रम्पटेरिफ**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लागू केलेलं वाढीव आयात शुल्क सुरू ठेवण्याचा आदेश तिथल्या फेडरल अपील न्यायालयानं दिला आहे. अमेरिकेच्या व्यापार न्यायालयानं ही शुल्क आकारणी तात्काळ थांबवण्याचा आदेश दिल्यानंतर दुसऱ्याच दिवशी ते पुन्हा लागू करण्याचा हा निर्णय देण्यात झाला आहे. ट्रम्प प्रशासनानं वाढीव टेरिफ आकारणी थांबवण्याच्या निर्णया विरोधात दाद मागण्यासाठी दाखल केलेल्या याचिकेवर विचार करण्यासाठी कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती देण्यात येत असल्याचं वॉशिंग्टनच्या यूएस कोर्ट ऑफ अपील फॉर द फेडरल सर्किटने म्हटलं आहे

**भारत-मंगोलिया**

भारत आणि मंगोलियादरम्यान सैन्यदलांच्या सरावाचं मंगोलियाची राजधानी उलानबटारइथं आयोजन करण्यात आलं आहे. उद्यापासून 13 जूनपर्यंत चालणाऱ्या या सरावात दोनहीदलांदरम्यान परस्पर कार्यपध्दतीचा अभ्यास केला जाणार आहे. नोमॅडिक एलिफंट यानावाच्या सरावाचा हा 17 वा भाग असल्याचं संरक्षण मंत्रालयानं सांगितलं. भारत-मंगोलियादरम्यान हा सैन्यसराव दरवर्षी आयोजित केला जातो.

**शब्द**

प्रसार भारतीनं आपल्या Prasar Bharati-Shared Audio-Visuals for Broadcast अर्थात पीबी शब्दच्या माध्यमातून पुरवल्या जाणाऱ्या विनामूल्य सेवांसाठी युट्युबर्स, पॉडकास्टर्स आणि व्हिडीओ एडिटर्सना नावनोंदणी करण्याचं आवाहन केलं आहे. पीबी शब्द हा स्वामीत्व हक्क-मुक्त, अस्सल आणि वापरण्यायोग्य असलेला सुरक्षित आशय, विनामूल्य उपलब्ध करून देणारा स्रोत आहे. पीबीशब्दचं पंधराशेहून वार्ताहर आणि बातमीदारांचं विस्तृत जाळं आहे. देशभरातील विविध ठिकाणी घडणाऱ्या घटनांचं वार्तांकन करण्यासाठी चोवीस तास कार्यरत असलेल्या 60 समर्पित संपादन सुविधा शब्दसाठी काम करत आहेत. देशभरातील बातम्यांसाठीची संकेतस्थळं SHABD द्वारे दूरदर्शन आणि आकाशवाणीवरील विश्वासार्ह बातम्यांचा लाभ घेऊ शकतात. SHABD वर सर्व प्रमुख भारतीय भाषांमध्ये 50 हून अधिक विविध क्षेणींद्वारे दररोज बातम्या प्रसारित होतात. शेती, तंत्रज्ञान, परराष्ट्र व्यवहार आणि राजकीय घडामोडी समाविष्ट असलेल्या 1,000 हून अधिक घडामोडी प्रसारित केल्या जातात.

**बेकायदा-बांगला**

राजधानी दिल्लीत राहणाऱ्या सुमारे 900 बेकायदेशीर बांगलादेशी नागरिकांची ओळख पटवण्यात आली असून योग्य पडताळणीनंतर त्यांना परत पाठवलं जाणार असल्याचं दिल्ली पोलिसांनी सांगितलं. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आवश्यक कागदपत्रं नसलेल्या स्थलांतरितांना परत पाठवण्याची प्रक्रिया अधिक वेगवान झाली आहे. सध्या सुरू असलेल्या भारत सरकारच्या 'पुश-बॅक' धोरणांतर्गत गेल्या सहा महिन्यांत दिल्लीतील सुमारे 700 बेकायदेशीर स्थलांतरितांना बांगलादेशला परत पाठवण्यात आलं आहे, अशी माहिती दिल्ली पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेचे विशेष आयुक्त देवेशचंद्र श्रीवास्तव यांनी दिली. अनेक राज्यांमध्ये बेकायदेशीररीत्या राहत

असलेल्या बांगलादेशी नागरिकांवरील कारवाई तीव्र झाली आहे. या काळात, दिल्लीसह महाराष्ट्र, हरियाणा, राजस्थान, गुजरात, उत्तर प्रदेश आणि गोव्यातून अशा बांगलादेशी नागरिकांना मोठ्या संख्येनं ताब्यात घेण्यात आलं आहे.

**आशियाई ॲथलेटिक्स**

दक्षिण कोरियात सुरू असलेल्या आशियाई ॲथलेटिक्स स्पर्धेत भारताच्या अविनाश साबळेनं काल तीन किलोमीटर अडथळ्याच्या शर्यतीत सुवर्ण पदक पटकावलं. अवघ्या आठ मिनिट 20 सेकंद आणि 90 मिनी सेकंदात त्यानं ही शर्यत पूर्ण केली. यापूर्वी 2019 मध्ये दोहा इथं झालेल्या स्पर्धेत अविनाश साबळेनं रौप्य पदक पटकावलं होतं.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल चंदिगडमध्ये झालेल्या पात्रता फेरीच्या पहिल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगलुरु संघानं पंजाब किंग्जवर 8 गडी राखून विजय मिळवला आणि स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. पंजाब किंग्ज संघानं दिलेलं 102 धावांचं आव्हान रॉयल चॅलेंजर्सनं केवळ 10 षटकांत दोन गड्यांच्या मोबदल्यात पार केलं. आज मुंबई इंडियन्सचा सामना गुजरात टायटन्सशी होईल. त्यातील विजेता संघ 1 जून रोजी पात्रता फेरीच्या दुसऱ्या सामन्यात पंजाब किंग्ज संघाबरोबर खेळेल. आणि या सामन्यातील विजेता संघ 3 जूनला अहमदाबादमध्ये अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूशी लढत देईल.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.